श्री. सुधाकर बावडे वि. बाळू बावडे वगैरे

## नियमीत दिवाणी दावा क्र. १२७/२००८ मधील निशाणी क्र.१५४ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ चे मयत वारस यांनी त्यांचेविरुध्द निशाणी क्र.१२८ वर झालेला उलटतपास नाही असा आदेश रद्द करुन मागितलेला आहे व उलटतपास घेण्याची परवानगी मागितलेली आहे.

०२. प्रतिवादी अर्जात कथन करतात की, मागील तारखेस कामकाज न्यायालयीन आयुक्तांच्या उलटतपासाकरीता नेमण्यात आलेले होते. त्या तारखे दिवशी प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ यांनी सकाळी ११.३० वाजता न्यायालयात साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची तयारी आहे असे सांगितले होते, पण त्यावेळी वादीतर्फे विधीज्ञ व साक्षीदार न्यायालयात हजर नव्हते. त्यादिवशी प्रतिवादींचे विधीज्ञ इतर न्यायालयातील कामकाज पाहून येतो अशी न्यायालयाला विनंती करुन सांगून गेले. इतर न्यायालयात अन्य कामे चालल्यामुळे विधीज्ञांना या न्यायालयात येण्यास थोडा विलंब झाला. त्या कालावधीमध्ये त्यांचेविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला. प्रतिवादी पुढे कथन करतात की, दुपारी ३.०० वाजता ते न्यायालयात आले व चौकशी केली त्यावेळी त्यांचेविरुध्द उलटतपास नाही असा आदेश झाल्याचे त्यांच्या निदर्शणास आले. त्यानंतर देखील प्रतिवादी साक्षीदारांचा उलटतपास घेण्यास तयार होते, परंतु साक्षीदार व वादींचे विधीज्ञ पुकारा करता हजर नव्हते. सबब, प्रतिवादींनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली व उलटतपास घेण्याची परवानगी मागितली.

०३. वादीने प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.१५५ अन्वये म्हणणे देवून हरकत नोंदविली आहे. वादीने अर्जातील संपुर्ण कथने नाकारलेली आहेत. वादीने असे कथन केले आहे की, न्यायालयीन आयुक्त साक्षीकरीता सकाळी ११.३० ते दुपारी ३.०० पर्यंत हजर होते, परंतु प्रतिवादींनी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उलटतपास घेतला नाही. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादींनी दुपारी ३.०० पर्यंत कोणताही मुदत अर्ज दिला नाही, त्यामुळे त्यांचेविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादींनी अर्जामध्ये कोणत्या न्यायालयात, कोणते काम प्रलंबित होते याबाबत तपशिल दिलेला नाही, त्यामुळे अर्जातील कारणे अयोग्य आहेत. सबब, त्यांनी रक्कम रु.५००/- च्या खर्चाची मागणी केलेली आहे.

०४. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींचे असे कथन आहे की, त्यादिवशी ते सकाळी ११.३० वाजता न्यायालयात येऊन गेलेले होते, परंतु साक्षीदार हजर नव्हते. त्यानंतर त्यांचे विधीज्ञ इतर न्यायालयामध्ये व्यस्त होते, त्यामुळे त्यांना दुपारी ३.०० पर्यंत न्यायालयात येता आले नाही. परंतु, विधीज्ञ कोणत्या न्यायालयामध्ये व्यस्त होते तसेच कोणत्या प्रकरणामध्ये व्यस्त होते याबाबतचा तपशिल अर्जामध्ये दिलेला नाही अथवा विधीज्ञांचे स्वतंत्र प्रतिज्ञापत्र देखील दिलेले नाही. तसेच प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे विधीज्ञ जरी इतर न्यायालयात व्यस्त असतील तर प्रतिवादींनी स्वतः या न्यायालयात थांबणे आवश्यक होते, कारण सकाळी ११.३० ते दुपारी ३.०० पर्यंत प्रतिवादींचा वारंवार पुकारा करण्यात आला त्यावेळी त्यांनी न्यायालयात हजर राहून विधीज्ञ इतर न्यायालयात व्यस्त आहेत व ते दुपारी येणार आहेत असे सांगणे आवश्यक होते. तसे प्रतिवादींनी केलेले नाही. यावरुन प्रतिवादींच्या अर्जातील कारणे ही संयुक्तीक वाटत नाहीत. परंतु, प्रकरणाची गुण-दोषावर निर्गती करण्यासाठी प्रतिवादींना साक्षीदाराचा उलटतपास घेऊन देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादींनी अर्जामध्ये संयुक्तीक कारण दिलेले नसल्यामुळे अर्जाचा खर्च त्यांच्यावर ठेवणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) अर्ज (निशाणी क्र.१५४) रक्कम रु.३००/-(रुपये तीनशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) खर्चाची रक्कम वादीला देण्यात यावी.

३) खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर साक्षीदार श्री.ए.बी.कुंभार यांना साक्षीसमन्स पाठविण्यात यावे.

४) प्रतिवादींनी रक्कम रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) साक्षीदाराला साक्षीभत्ता म्हणून दयावेत.

५) साक्षीभत्ता न्यायालयात जमा केल्यानंतर साक्षीसमन्स पाठविण्यात यावे.

दिनांकः १२/०७/२०१९
इचलकरंजी.

**( पी.एम.माने )**
५वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
इचलकरंजी.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil |
| Name of Court | P. M. Mane,<br>5th Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Ichalkaranji. |
| Date of Dictation | 12/07/2019 |
| Order signed by P.O. on | 12/07/2019 |
| Order uploaded on | 15/07/2019 |